नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०७/२०२५ (सोमवार)**

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पोलीस स्टेशन कळमेश्वरः— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. ०५/२०२४ कलम ३५४,३५४(अ),३५४(ब),३२३,५०४,५०६ भादंवि सहकलम ८, १० ,१२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर घटना पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत दिनांक ०४/०१/२०२४ रोजी १४:०० घडलेली असुन यातील फिर्यादी आणि त्यांचे पती असे शेतमजुरीच्या कामाला गेले असता यातील **आरोपी नामे अरूण ऊर्फ रामु धनराज ठाकरे, वय ५२ वर्ष रा. झुनकी सावळी (बु)** ता. कळमेश्वर, जि. नागपुर याने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी, वय ७ वर्षे, ही खेळत असतांना तेथे जावुन तिला पकडुन तिला उचलुन बकरी च्या गोठयात नेत असतांन पिडीत बालीकेचा भाऊ, वय ८ वर्षे, याने पिडीतेचा हात पकडुन तिला थांबविण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्याला गालावर दोन थापड मारून पिडीतेला बकरी च्या गोठयात नेवुन तिचा विनयभंग केला.

पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. सदर गुन्हयात जिल्हा व सत्र न्यायधीश क्रमांक ३ श्री एस. एच. ग्वालानी यांनी आज दिंनाक २८/०७/२०२५ रोजी वरील **नमुद आरोपीस कलम १० पोक्सो अन्वये ०५ वर्ष सश्रम कारावास व १०,०००/—रूपये दंड**,दंड न भरल्यास ०३ महिने सश्रम कारावास **आणि कलम ३२३,५०४,५०६ भादंवि अन्वये ०१ वर्ष सश्रम कारावास व १,०००/—रूपये दंड** ,दंड न भरल्यास ०२ महिने साधा कारावासाची शिक्षा **अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती रश्मी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन श्रेणी पोउपनि सुरेंद्र ठाकुर पो.स्टे. कळमेश्वर यांनी मदत केली आहे.

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध
## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन रामटेक येथे दिनांक १६/१०/२०२४ रोजी अप क्र ७६८/२०२४ कलम १३७ (२) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा आणि अज्ञात आरोपी यांचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी आणि आरोपीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोउपनि श्री मंगेश वानखेडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे त्यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला असता दिनांक २८/०७/२०२५ रोजी गोपनिय माहीतीवरून नमुद गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलीचा आणि आरोपी नामे मनिष राजेश नागपुरे,वय २३ वर्षे, रा मानापुर,ता. रामटेक जि. नागपुर यांना नागपुर येथुन ताब्यात घेतले आहे. नमुद अपहृत मुलगी आणि आरोपी यांना पुढील तपास कामी रामटेक पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ८ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ३ लाख ६० हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## खापरखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक २७/०७/२५ रोजी खापरखेडा पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा वलनी, वार्ड क्रं ४, बुध्द विहाराजवळ एका डब्ल्यु सी एल कॉटर मध्ये काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे खापरखेडा पोलीसांनी तात्काळ पंचासह घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे **१) संतु बिकाउ गौतम,वय ३२ वर्षे, वार्ड क्रं ६, वलनी, २) मेराज मिनाज अन्सारी,वय ३० वर्षे,वार्ड क्रं २, वलनी,३) आशिक अकबर अन्सारी, वय ३७ वर्षे रा. वार्ड न .०६ वलनी**

**,४) अफताब अहमद इंद्रीसी, वय २८ वर्षे, रा. वार्ड न .०६ वलनी, ५) तसलीम कलीमुल्ला इंद्रीसी, वय २० वर्षे, रा. वार्ड न .०६ वलनी, ६) सलिम उर्फ सल्लम सिराजउद्दीन शेख, वय २८ वर्षे, रा. वार्ड न .०६ वलनी, ७) इंमत्याज अहमद खैराती सलमानी, वय २२ वर्षे, रा. वार्ड न .०६ वलनी, ८) विक्की जयराम चौबे, वय २६ वर्षे, रा. वाघोडा,ता. सावनेर हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले.** आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, ५,५०० रूपये रोख रक्कम , आठ मोबाईल आणि घटनास्थळावरून ५ मोटर सायकल १) अँक्टीव्हा क्र. एम एच ४० बी.एम. ४४६४, २) हिरो स्प्लेंडर क्र. एम एच ४० सी.जे. ९३३६ ३) रॉयल इनफिल्ड बुलेट क्र. एम. एच. ४० बी. एम ७१८५ **४)** विनाक्रमांची लाला काळया रंगाची पल्सर मोटर सायकल आणि **५)** विना क्रमांकाची लाल काळ्या रंगाची एच. एफ. डीलक्स मोटर सायकल असा **एकुण ३,६०,५००/— रूपयांचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ८ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ४,५ म.जु .का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू, बाळगणाऱ्या/विक्री/वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १४ गुन्हे नोंद एकुण ५,१५,०२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २७/०७/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री/वाहतुक करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू, आणि गुन्हयातील वाहन असा एकुण ५,१५,०२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन भिवापुर** येथे आरोपी महेंद्र देवाजी गजभिये, वय ५९ वर्ष रा.मानोरा ता.भिवापूर जि नागपूर आणि महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे गोडझा तुळशीराम राजपुत वय ६० वर्ष रा राजुरवाडी उमरेड आणि अशोक किसन मांढरे वय ५९ वर्ष रा गांगापुर उमरेड याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे अमन अविनाश वासनिक वय २५ वर्ष रा. वार्ड क्र.०६ मांढळ ता.कुही जि.नागपुर आणि छोटुलाल गोंविदा थुल वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र.०४ पाचगाव ता.उमरेड जि.नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे अंबीर सुधाकर

काकडे वय ३० वर्ष रा धवळपेठ ता जि नागपुर आणि शंकर कवडुजी पारसे वय ३५ वर्ष रा वार्ड ०२ बूटीबोरी यांचेवर गुन्हा नोंद आहे. तसेच आरोपी नामे १) सोहेल फारूख शेख वय २४ वर्ष रा जुनी वस्ती बूटीबोरी २) गणेश देवराव भोयर वय २७ वर्ष रा जुनी वस्ती बूटीबोरी हे बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम.एच. ४० सी.टी ४९७२ वाहनामध्ये अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी नामे महादेव कचरू बागडे वय ४३ रा टेकाडी ता पारशिवनी याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे सौरभ प्रकाशराव टोके वय ३४ वर्ष रा धोटीवाडा आणि संदीप महादेवराव टोके वय ४० वर्ष रा धोटीवाडा यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे महेश प्रकाशराव चरपे वय ३८ वर्ष रा.वार्ड नं. ०८ मेढला ता. नरखेड जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे अमजद हारून अंसारी, वय २४ वर्ष, रा. वार्ड न ०१ सिल्लेवाडा, ता. सावनेर, याचेवर १ गुन्हा नोंद आहे. अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १४ गुन्हे दाखल केले आहे.

## रात्र गस्त दरम्यानकोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २७/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २८/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री संतोष गायकवाड , उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत वलनी येथे श्री संतोष गायकवाड यांच्या नेतृत्वात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी पोलीस स्टेशन खापरखेडा येथील अधिकारी ,अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. दहेगाव येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली.






CLASSIC
prakash
MH02BZ4758

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने